**Publication:** Mumbai Chouffer **Date:** Thursday,12th February, 2015

**Edition:** Mumbai

# छोट्यांच्या मोठ्या 'आयडिया'

## हॅप्पी इंडियात बच्चे कंपनीची धम्माल



जे शिक्षणापासून वंचित आहेत, अशा बालकामगारांकरिता ते शिक्षण सुनिश्चित करू शकतात. ते शाळांमध्ये मुला-मुलींकरिता टॉयलेट बॉक्स बनविण्यास इच्छुक आहेत आणि झोपडपट्ट्यांमध्ये साफसफाईला प्रोत्साहन देण्याकरिता व मॉल्स आणि स्थानिक बाजारांमध्ये पर्यावरण हितकारक शॉपिंग बॅग्ज आणण्याकरिता त्यांची धडपड सुरू आहे. ही सर्व शाळेत जाणारी मुले आहेत, जी देशाला हॅप्पी इंडिया बनवू इच्छितात. ते भविष्याचे चेंजमेकर्स असून, परिवर्तन घडविण्यास ते सज्ज आहेत.

इंडिया फर्स्टच्या हॅप्पी इंडियाकरिता ३०४ शाळांतील ११ ते १५ वर्षे वयोगटाच्या १५ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी पाठविलेल्या 'आयडिया' (कल्पना)तून २५ विद्यार्थ्यांच्या संघाची निवड करण्यात आली. त्यात मुंबईतल्या सहा संघांचा समावेश आहे. तसेच त्या २५ संघांच्या कल्पना सत्यात उतरवण्यासाठी इंडिया फर्स्टच्या वतीने ५० हजारांचे अनुदानही देण्यात आले असून, काही दिग्गज उद्योजकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे कार्य सुरूही झाले आहे. नुकतेच हे २५ संघ मुंबईत येऊन गेले. तेव्हा त्या छोट्यांच्या मोठ्या आयडिया मांडण्याची लकब पाहता, खरंच हे आगामी काळात देश घडवू शकतील, असे वाटत होते.

त्यातील भोपाळच्या विद्यार्थ्यांच्या संघाने स्वच्छ भारत मोहिमेकरिता एक महत्त्वपूर्ण कल्पना सर्वांसमोर मांडली. टॉयलेट आणि वॉशबेसिनची साफसफाई कायम राखण्याकरिता विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करण्याकरिता त्यांनी आठ शाळांमध्ये बालपंचायती उभारल्यात. तसेच जयपूरच्या संघाने लोकांच्या सवयी बदलण्याकरिता आणि वापरलेल्या कपड्यांपासून बनवलेल्या शॉपिंग बॅग्जचा वापर करण्याची तत्परता दाखवली. या विद्यार्थ्यांची शॉपिंग मॉल्समध्ये बॅग्ज विकण्याची योजना आहे. त्यांनी विविध रोड शोज्च्या माध्यमातून प्लॅस्टिक बॅग्जच्या वापराबाबतही जागरूकता पसरवली आहे. तसेच ४०० पेक्षा जास्त कुटुंबांना त्यांनी प्लॅस्टिक बॅग वापरापासून दूरही केले आहे.

नाशिकच्या संघाने स्त्रीभ्रूण हत्येवर कल्पना राबवली व त्यांनी मुलींकरिता स्वसंरक्षणाचे वर्गदेखील चालवले, तर मुंबईच्या संघाने स्वस्थ भारत निर्माण प्रकल्पावर भर दिला. त्यांना क्रॉस-सब्सिडायझेशन मॉडेलसह सामान्य भाज्या कमी किमतीमध्ये उपलब्ध करण्याचा अधिकार सुनिश्चित करायचा आहे. ज्यात मध्यम उत्पन्न अणि कमी उत्पन्न गटाच्या लोकसंख्येला किरकोळ विक्रेत्यांकडून थेट भाज्या खरेदी करण्याचा लाभ मिळेल. असेच विविध कल्पना इतर विद्यार्थ्यांच्या गटाने जनसमुदायापुढे मांडल्या.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, विद्यार्थ्यांच्या या प्रयत्नांचे 'यंग चेंज मेकर्स' संग्रहाच्या रूपाने प्रकाशन करण्यात येणार आहे. त्याकरिता इंडिया फर्स्ट आणि सृष्टी पब्लिशर्सने पुढाकार घेतला आहे.

A Joint Venture of
Bank of Baroda Legal & General Andhra Bank